भाग ३

।। चिंतनक्षण ।।

डॉ. सुहास पेठे

।। श्री ।।

।। चिंतनक्षण ।।

भाग : ३

डॉ. सुहास पेठे

एम्.ए., पीएच्.डी. (तत्त्वज्ञान)

*** चिंतनक्षण : भाग-३ ***

पुस्तकरूपाने प्रकाशित सातवी आवृत्ती : सप्टेंबर २०१४
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :
वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

आपले जीवन
संतांच्या उपदेशाप्रमाणे घडवणे
ही संतांची खरी सेवा होय.६१

निःस्वार्थीपणे व हितबुद्धीने
दुसऱ्याशी वागणे म्हणजे
त्याच्यावर प्रेम करणे होय.६२

साधना एक वेळ
कमी केलेली परवडली,पण
साधनेचा अभिनय करण्याची
बुद्धी होऊ नये.६३

बुद्धीशिवाय पुढे जाता येत नाही, पण ती फार पुढेही जाऊ देत नाही, कारण तिच्याबरोबर अहंकार असतो.६४

इतरांचे गुण पाहाणे
आणि नावाजणे हे
औदार्य आहे.६५

एकान्त आपल्याला
कोठेही जपता येतो.६६

कार्यकारणभाव गूढ असतो,
हे समजून घेतल्यास
चित्ताच्या अशांततेचे प्रमाण
कमी होईल.६७

घटना घडतच राहातात
पण त्यांचे ओझे वागवणे
नको.६८

देहाशी तादात्म्य कमी कमी होत गेले तर मनुष्य खऱ्या अर्थाने परिपक्व होईल.६९

प्रारब्धाने आलेले
सर्व आनंदाने स्वीकारणे
म्हणजेही वैराग्यच.७०

आपण दुसऱ्यांची काळजी
घेतल्यास आपली काळजी
ते तरी घेतात नाहीतर
भगवंत तरी.७१

सत्कर्म फक्त परमार्थाची
संधी उपलब्ध करून देईल,
परमार्थात पुढे नेत नाही.७२

माझ्यात देवपण आहे -ही
वस्तुस्थिती कळणे अवघड,
टिकवणे अवघड व व्यवहारात
आणणे त्याहीपेक्षा अवघड -
म्हणून 'भक्ती बरी'.७३

क्षमाशीलतेला मोठ्यात मोठे व कर्तृत्वाच्या अहंभावाला लहानात लहान - मन बाळगू शकणाऱ्याला शांती दूर नाही.७४

लौकिकातले शौर्य
शस्त्रे घेऊन लढण्यात आहे,
परमार्थातले शौर्य
शस्त्रे टाकून लढण्यात आहे.७५

कर्माकडे
वृत्ती तपासण्याची संधी
म्हणून पहावे.७६

देव म्हणून आपण
जी कल्पना करतो त्यात व
त्याच्यापलीकडे राहतो
तो देव.७७

व्यवहारातील घटनांचे मी का,
कसे व किती चिंतन करावे,
हे खरोखर शिकले पाहिजे.७८

रामचिंतन होत नाही
तोवर साधक म्हणवून
घेऊ नये, हे बरे.७९

शांततेच्या गाभाऱ्याचे
सहनशीलता हे एक
द्वार आहे.८०

हवेपण हा अग्नी आहे, तो समाधान जाळल्याशिवाय राहात नाही.८१

आपल्या अनेक आसक्ती
कर्तव्यांचे रूप धारण करून
आपला घात करतात.८२

नम्रतेत आपल्या गुणांची रास्त
जाणीव,अवगुणांची तीव्र खंत
याबरोबरच दुसऱ्यांच्या गुणांची
तीव्र जाणीव व त्यांच्या अवगुणांबद्दल
औदार्य अंतर्भूत आहे.८३

आपले फक्त वाढणे असते.
खरे जगणे आनंदाचे असते.
तसे जगणाऱ्याचा
वाढदिवस करणे उचित.८४

आपले लघुत्व लक्षात आले तर गुरुत्वाचा अर्थ, व्याप्ती व महत्त्व लक्षात येईल.८५

नियंत्रित चिंतन कमी
म्हणून आपले
अनियंत्रित चिंतन
जास्त होते.८६

आपले अनियंत्रित चिंतन
गुरूविना थांबणार नाही.८७

देहाचे दुःख संपायला कदाचित मृत्यूपर्यंत थांबावे लागेल, पण मनाचे दुःख संपवायचे ठरवले तर आजही संपेल.॥

परमार्थात आपण जे मागतो
त्यामागे आपला
खरा भाव नसतो
म्हणून ते मिळत नाही.८९

आजवरच्या आयुष्याचे
फोलपण लक्षात येणे
ही पुण्याची पहाट आहे.९०

डॉ. सुहास पेठे यांची ही बोधवचने म्हणजे शुद्ध परमार्थमार्गावरील अभ्यासू व्यक्तींना चिंतनाची एक पर्वणीच होय. कारण या वचनांमागे डॉ. पेठे यांचे तीन तपांचे मूलगामी चिंतन, स्वानुभव, अभ्यास, प्रयोग अशी विस्तृत पार्श्वभूमी आहे. शुद्ध परमार्थाचे आकलन व आचरण यांसाठी त्यांची ही वचने आमच्याप्रमाणे इतरांनाही उपयोगी ठरतील म्हणून संकलित व प्रकाशित होत आहेत.

* संतछाया, सातारा *